पीकपाणी

# नवीन द्राक्षबागेत रि-कटची पूर्वतयारी



**प्रा. योगेश भगुरे**
(मो.नं. ९९२२४१४८७३)
**प्रा. दीपक पाटील**
कर्मयोगी दुलाजी सीताराम पाटील
कृषी महाविद्यालय, नाशिक



द्राक्ष पिकाच्या पानांचे आयुष्य साधारणतः जातीपरत्त्वे १६० ते १६५ दिवसांचे असते. त्यानंतर ही पाने पिवळी होऊन गळून पडतात. म्हणजेच द्राक्षबागेत वेलींचा पूर्ण सांगाडा तयार करावयाचा झाल्यास रि-कट घेऊनच हे शक्य होते. त्यासाठी नवीन द्राक्षबागेत रि-कट ही महत्त्वाची कार्यवाही पूर्ण करावी लागते.

द्राक्ष हे भारत देशातील महत्त्वाचे फळपीक समजले जाते. इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात द्राक्ष लागवडीचे क्षेत्र जास्त आहे. महाराष्ट्रातील द्राक्षे त्यांच्या विशिष्ट चवीमुळे जगभरात लोकप्रिय आहेत. भारतातून मोठ्या प्रमाणात द्राक्षे निर्यात केली जातात. द्राक्षांचा उपयोग प्रामुख्याने खाण्यासाठी, बेदाणे तयार करण्यासाठी व मद्य तयार करण्यासाठी करतात. इतर पिकांच्या तुलनेत आर्थिकदृष्ट्या द्राक्ष पीक फायदेशीर समजले जाते. त्यामुळे द्राक्ष पिकाखालील क्षेत्र दिवसेंदिवस वाढत आहे.

द्राक्ष पिकाची अभिवृद्धी कलम करून केली जाते. साधारणपणे ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात जागेवर कलम केले जातात. कलम करतेवेळी खुंट व कलम काडीची जाडी, त्यातील अन्नसाठा, बागेतील परिस्थिती, कीड-रोगांचा प्रादुर्भाव इ. बाबींमुळे कलमांची वाढ कमी- अधिक होते. तसेच द्राक्ष पिकाच्या पानांचे आयुष्य साधारणत: जातीपरत्त्वे १६० ते १६५ दिवसांचे असते. त्यानंतर ही पाने पिवळी होऊन गळून पडतात. म्हणजेच द्राक्षबागेत वेलींचा पूर्ण सांगाडा तयार करावयाचा झाल्यास रि-कट घेऊनच हे शक्य होते. त्यासाठी नवीन द्राक्षबागेत रि-कट ही महत्त्वाची कार्यवाही पूर्ण करावी लागते.

रि-कट हा शक्यतोवर जानेवारी ते फेब्रुवारी महिन्यात घेतला जातो. यावेळी वातावरणातील किमान तापमान हे १५ अंश सें.ग्रे.च्या पुढे असते. अशावेळी वेलीच्या शरीरशास्त्रीय हालचालीस वेग येतो. पूर्वतयारीच्या दृष्टीने द्राक्षबागेतील पुढील काही महत्त्वाच्या गोष्टींचा विचार करणे गरजेचे आहे.

**रोग नियंत्रण** : यावर्षी बागेत कलम केल्यानंतर पावसाचे प्रमाण जास्त होते. तसेच नंतरच्या काळात वातावरण अधून-मधून ढगाळ होते. ही सर्व परिस्थिती बागेत विविध रोगांच्या प्रादुर्भावासाठी अनुकूल होती. त्यामुळे बागेत केवडा, भुरी, करपा यांसारख्या रोगांचा प्रादुर्भाव दिसून येईल. तसेच बुरशीचे बीजाणू पाने, काडी या ठिकाणी सुप्तावस्थेत असतील. रि-कट घेतल्यानंतर अनुकूल वातावरण मिळाल्यास या सर्व रोगांचा प्रादुर्भाव नवीन फुटींवर होऊ शकतो. त्यामुळे रि-कट अगोदर शिफारशीनुसार बुरशीनाशकांचा वापर करावा.

**काडीची परिपक्वता महत्वाची** : बागेत रि-कट घेत असताना कलम जोडाच्या वर किमान ७ ते ८ डोळे प्रत्येक काडीवर परिपक्व असणे आवश्यक आहे. परंतु यावर्षी असलेल्या प्रतिकूल वातावरणामुळे, रोगांच्या प्रादुर्भावामुळे काही बागेत काडीच्या परिपक्वतेसाठी अडचण आली. अशा बागेत पालाशयुक्त खतांचा फवारणीद्वारे, जमिनीतून वापर उपयुक्त ठरेल.

**अन्नद्रव्य व्यवस्थापन** : साधारणतः रि-कट घेण्याच्या १५ दिवस अगोदर दोन कलमांच्या मध्ये तीन-चार इंच खोल अशी चारी घ्यावी. या चारीमध्ये जवळपास १० किलो कुजलेले शेणखत टाकून त्यावर १५०-२०० ग्रॅम



रि-कट नंतर बागेत ओलांडे व मालकाडी एकाच वेळी तयार होण्यास मदत होते



रि-कट नंतर झालेली जोमदार वाढ

सुपरफॉस्फेट, प्रतिएकरी २५-३० किलो डीएपी आणि माती परीक्षणाच्या आधारे शिफारशीनुसार सूक्ष्म अन्नद्रव्य मिसळून ही चारी मातीच्या थराने झाकून घ्यावी. यामुळे दोन वेलीच्या मध्यात बोद तयार होईल. या बोदामध्ये हवा खेळती राहिल्यामुळे नवीन मुळी लवकर तयार होईल व ही मुळी कार्यक्षम अशी असेल.

**पानगळ करणे** : रि-कट घेण्याच्या आठ ते दहा दिवस अगोदर कलम जोडाच्या वरची सात ते आठ पाने हाताने अथवा इथोफेनचा वापर करून गाळून घ्यावीत. यामुळे ज्या ठिकाणी रि-कट घ्यायचा आहे, त्या भागातील डोळे तापतील आणि फुगतील. अशा डोळ्यांमधून फूट लवकर व एकसारखी निघण्यास मदत होते.

**बागेत रि-कटची योग्य वेळ** : रि-कटनंतर बाग फुटण्याकरिता वातावरणात विशिष्ट तापमान व आर्द्रता असणे गरजेचे असते. ठराविक तापमानामध्ये वेलीच्या शरीरशास्त्रीय हालचाली होत असतात. बागेतील किमान तापमान हे १५ अंश सेल्सिअसच्या पुढे असल्यास वेलीच्या शरीरशास्त्रीय हालचाली योग्य प्रकारे होत असतात. तेव्हा रि-कट साधारणत: फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात घेणे योग्य राहील. अशाप्रकारे पूर्ण पूर्वतयारी झाल्यानंतर योग्य वातावरणात कलम जोडाच्या वर काडीच्या परिपक्वतेनुसार ३-४ डोळे ठेऊन रि-कट घ्यावा.

**हायड्रोजन सायनामाईडचा वापर** : रि-कट घेतलेल्या बागेत एकसारखे व लवकर डोळे फुटण्याच्या दृष्टीने हायड्रोजन सायनामाईडचा वापर करणे गरजेचे आहे. काडीची जाडी, डोळ्यांची परिस्थिती व वातावरणातील तापमान या गोष्टींचा विचार करून तज्ञांचा सल्ला घेऊन हायड्रोजन सायनामाईडची मात्रा घ्यावी. साधारणपणे ३५-४० मि.ली. हायड्रोजन सायनामाईड प्रति १ लिटर पाण्यात घेऊन योग्य प्रकारे पेस्ट लावावी.

**कलम काड्यांची बांधणी** : रि-कट झाल्यानंतर गरजेनुसार कलम काड्या बांबूला सुतळीच्या सहाय्याने व्यवस्थित बांधून घ्याव्यात. तसेच खुंटाला असलेल्या फुटी काढून टाकाव्यात.

**कीड- रोग व्यवस्थापन** : रि-कटनंतर ८-१० दिवसांनी डोळे फुगण्यास सुरवात होईल. या अवस्थेत उडद्या किडीचा प्रादुर्भाव होऊ शकतो. ही कीड फुगलेला डोळा पोखरून त्यामधून निघणारी फूट संपवते. त्यामुळे या किडीचे वेळीच नियंत्रण करणे अत्यंत आवश्यक आहे . यासाठी लॅम्डा सायलोथ्रिन ५ मि.ली. प्रति १० ली. पाणी किंवा इमिडाक्लोरोप्रिड ४ मि.ली. प्रति १० ली. पाणी या प्रमाणात घेऊन फवारणी करावी.

अशा प्रकारे रि-कट पूर्वतयारी करून नंतर व्यवस्थित व्यवस्थापन केल्यास वेलींची एकसारखी वाढ होऊन पूर्ण बागेत ओलांडे, मालकाडी हे एकाच वेळी तयार होऊन पहिल्याच वर्षी चांगले उत्पादन मिळू शकते. ■

---

## लेखकांना आवाहन...

**'पूर्वा कृषिदूत'** परिवाराशी आपण गेली काही वर्षे लेखक या नात्याने निगडित आहात, याचा मन:पूर्वक आनंद वाटतो. (सध्या आपण प्रस्तुत मासिक डिजिटल स्वरुपात प्रकाशित करीत आहोत. ही बहुरंगी ऑनलाईन आवृत्ती आपणास कशी वाटते, ते जरुर कळवा.)

आपल्या लेखासोबत आपला सविस्तर पत्ता मोबाईल नंबरसह नमूद करावा ही विनंती. तसेच आपला पासपोर्ट आकाराचा फोटोही जरुर पाठवावा. आपले लेखन सहकार्य असेच लाभत राहील याची खात्री आहेच; आपल्या नवीन उपक्रमांना तसेच व्यक्तिगत, व्यावसायिक संकल्पांना आमच्या हार्दिक शुभेच्छा.

-: आमचा पत्ता :-

पूर्वा कृषिदूत, एम-११३, एम.आय.डी.सी., अंबड, नाशिक- ४२२०१० (महाराष्ट्र).

email:poorvakrushidoot@gmail.com

**- संपादक, 'पूर्वा कृषिदूत'**